स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयावरील पीएच. डी पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन अराखडा

"इलाही जमादार यांची गझल: एक चिकित्सक अभ्यास"

: संशोधक :

विनोद यादवराव कांबळे

(एम ए बी एड नेट)

भ्रमणध्वनी : ९४२००७३७०९/९६५७५८०९४४

इ-मेल : vinodkamble 24095@gmail.com

: मार्गदर्शक :

प्रा. डॉ. राजेंद्रकुमार लक्ष्मण लोणे

मराठी विभाग प्रमुख

श्री रेणुकादेवी वरिष्ठ महाविद्यालय, माहूर

भ्रमणध्वनी: ९४२१३०२५३४

इ-मेल : rajendrakumarlone510@gmail.com

: संशोधन केंद्र :

प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड

प्रस्तावना:-

मराठी गझलेचे प्राचीनत्व दाखवण्यासाठी अमृतराय (१६९८ ते १७५३) व मोरोपत (१७२९ से १७९४) याच्या रचनांचा उल्लेख केला जातो. छंद व बाहारारूप काहीसे गजलचे असल्यामुळे हा प्रयास होत असावा. त्याच्या बारवार नमूद होणाच्या या रचना गजल-नुमा (गजलसदृश्य) या प्रकारात मोडतात. त्या काव्यरचनांना गझल संबोधता येत नाही. गजलचे अन्य निकष या रचना पूर्ण करीत नाहीत.

गझल ही 'काव्यविधा' अरबी भाषेच्या 'कसिदा' नावाच्या काव्यप्रकारातून निर्माण झाली. त्यातील 'ती' नावाचा हिश्श्याला अलग काढून गझल' हेरूप प्राप्त झाले. फारशी भाषेत ही काव्यविधा अधिक, लोकप्रिय झाली. मूळात गझल यमकावर(काफियावरच) संपत असे, पण फारशी कवींना तिच्यात रदीफ म्हणजे अन्य स्थिर यमकाची जोड दिली. यामुळे गजलच्या गेय-सौंदर्यात बाद झाली अन कर्णमधुरता दुणावली. इराणमध्ये गझल फारच लोकप्रिय झाली. खरतर उर्दूला इराणच्या फारशी भाषेने दिलेली ही एक देणगी आहे.

खिलजी काळातील फारशी कवी अमीरखुसरोने तत्कालीन प्रचलित भाषेत अरबी-फारसी शब्दांच्या संयोगाने एक नवी भाषा विकासित केली व तिचे हिंदी, हिंदवी असे नामकरण केले. अमीर खुसरोला हिंदीचा आय गझलकार म्हणतात.

मराठीत गझल ही काव्यविधा आणण्याचे श्रेय डॉ. माधवराव पटवर्धन उर्फ माधव जुलियन' यांनाच द्यावे लागेल. त्यांनी "छंदरचना या प्रबंधग्रंथाद्वारे ७०-८० उर्दू गझलेचे गेय छंद मराठीत आणले व गज्जलाजली' या काव्यसंग्रहात त्या गजलवृत्तात (अरबी फारसी वृत्तात) काव्यरचना केली. यातील फारच थोड्या रचना 'गझल" व्याख्येत बसतात.

सर्वार्थाने मराठी गझल स्वर्गीय सुरेश भटांनीच मराठीत रुजवली आहे. 'रूपगंधा' त्याच्या पहिल्या काव्यसंग्रहात (१९६१) काही गझल आहेत. १९६३ सालापासून सुरेश भट जाणीवपूर्वक गझल सृजनानाकडे आहेत. लय ताल राग इत्यादीचे मूलभूत ज्ञान भटाना होतेच. यामुळे त्यांचे गझल संग्रह एकामागून एक निघत होते. त्यामध्ये त्यांचा 'रंग माझा वेगळा' एक महत्त्वाचा गझलसंग्रह आहे. सुरेश भटांनी गझल सृजनासाठी मराठी कवींनी प्रवृत्त व्हावे म्हणून गावोगावी गझल मार्गदर्शन गझल गायनाचे कार्यक्रम केले. १९७०-८० च्या दरम्यान गझल लिहिणाऱ्या गझलकरांच्या गझलांवर प्रणयाचा रंग गहरा होता. शैली पूर्णपणे सुरेश भटाची होती. इलाही जमादार यांची शैली मात्र उर्दू गजल शैलेशी नातं सांगणारी होती. या काळातल्या गझला व्यक्तिगत दुःखाचे अन्ययाचे घराणे सांगणाऱ्या होत्या. समष्टी हळूहळू गजलेत ८० नंतरच अधिक प्रकर्षाने साकारू लागला.

माधव जुलियन यानी मराठीत गझल आणली. सुरेश भटांनी गजलेला साज चढवला. इलाही जमादार यांनी मराठी गझलेचा दर्जा वाढवला. गझल क्षेत्रातील अतिशय नामावत गझलकार जखमाचे सुगंधी पण जपणारा गझलकार' म्हणून इलाही जमादार यांचे नाव पुढे येते. याचा जन्म १ मार्च १९४६ रोजी सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील दुधगाव या लहान झाला. तसे इलाही जमादार यांच्या चहूबाजूंनी साहित्यरत्न चोर शाहीर प्रतिभेचा महामेरू फकीराचा निर्माता अण्णाभाऊ साठे यांचे वाटेगाव, कर्मवीर भाऊरावाचे कुमगाव, हिंदकेसरी मारुती माने यांचे कवठेपिरान सरोजिनी बाबर या थोर संशोधक व समीक्षीकेचे गाव बाबरी, इंग्रजी राजवटीतील प्रसिद्ध क्रांतिकारी नाना पाटील यांचे गाव, इलाहीना कायम प्रेरणा देतच राहत आहे. इलाहीची घरची परिस्थिती अत्यंत नाजूक होती घरात चार भाऊ, चार बहिणी, आई-बाबा, आजी असे ११ न राहत होते. कमवणारे त्यांचे वडील हे एकमेव होते. तीन एकर कोरडवाहू शेती हे त्यांचे उदरनिर्वाांचे मुख्य साधन होते. यावर एवढ्या मोठ्या कुटुंबाचे अवलबून असणे किती अवघड आहे लक्षात येते. इलाही यांच्या आई बाबांनी त्याना कोणतेच काम सांगितले नाही. घरात अठरा विश्व दारिद्र्य असूही इलाहींना त्याची झळडी बसू दिली नाही.

१९७८ ला त्यांनी लग्न केले. त्यांची पत्नी सुशिक्षित होती. त्या सांगली पंचायत समितीमध्ये कारकून म्हणून इलायच्या पत्नी कार्यरत होत्या. तर पुण्यामध्ये इलाई जमादार हे नोकरी करत होते. मुलगा आणि पत्नी आणि कुटुंबापासून पुणे या ठिकाणी त्यांना एकांतात नोकरीमुळे राहावे लागले. आपल्या नोकरीला सहा वर्षे शिल्लकः असतानाच त्यांनी वयाच्या ५४व्या वर्षातच सेवानिवृत्ती घेतली आणि नोकरीतून ते मुक्त झाले. आपले दुःख घेऊन एकाकीपण जगताना त्यांचे विश्व म्हणजे गझल. त्यांचे मझलेचे रसिक त्यांच्यावर जीवापाड प्रेम करतात म्हणून त्यांचा जीवनप्रवास पुढे ते करतात. एकदा इलायच्या सहकारी मित्राने इलाही जवळ त्यांच्या कसली तरी चिठ्ठी असल्याचे पाहिले आणि त्यांना शंका आली त्या सहकारी मित्रानी इलाहीला सरळ चिठ्ठी मागितली शेवटी नाही हो करित इलाहीने आपल्या खिशातील चिठ्ठी आपल्या सहकार्याच्या हातात दिली. त्यांच्या सहकार्यांनी चिठ्ठी हातात घेतली आणि मोठ्या उत्सुकतेने ते मनातल्या मनात वाचू लागले. रघुशेट्टी असे त्या सहकार्याचे नाव होते. चिठ्ठी वाचून ते अवाक झाले आणि ओरडत म्हणाले, अरे ही तर कविता.... जबरदस्त कविता.. आणि तेव्हा पहिल्यांदा त्या मित्रांनी इलाही मधल्या कवी मनाचे दर्शन घडून दिल्याच आणि इलाहीना आपल्या मधील कवीची येथेच प्रथम भेट झाली. येथूनच काव्यप्रांतील प्रवासाला आरंभ झाला. कालांतरांतराने डॉ. नाडकर्णीने इलाहींना २५ डिसेंबरच्या मुशायराला येण्याचे आमंत्रण दिले. ठरल्याप्रमाणे इलाही जमादार पुण्याच्या एसपी कॉलेज समोरील ख्रिस्ती क्लासच्या हॉलमध्ये गेले. मैफील छान रंगली होती. आयुष्यात पहिल्यांदा असंख्य कवी, गझलकार व रसिकांसमोर असताना इलाही मंचावर आले. आयुष्यातील पहिली गझल त्यानी रसिक मायबापांसमोर सादर केली. इलाहीने लिहिलेली त्याची पहिलीच गजल ते आपली रचना सादर करू लागले.

‘सांजवेळी सोबतीला सावली देऊन जा
भैरवी गाईन मी तु मारवा गाऊन जा’

इलाही जमादारांचा गझल लेखनाचा प्रवास आता जोर धरू लागला. असंख्य रचना त्यांच्याकडून जन्मास येऊ लागल्या ते गजल्याच्या प्रेमात इतके पडले की गझल म्हणजेच इलाही आणि इलाही म्हणजेच गझल, आयुष्य म्हणजे चढउतार सुखदुःखे इलाहीच्या जीवनातही असे प्रसंग आले त्यामुळे इलाही खचले. पुढे दहा महिने गेले पण इलाहीने काव्य प्रांतात अद्यापही पुनरागम केले नव्हते मात्र इलाहीच्या आदर्श प्राध्यापक डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी आणि दुसरे आदर्श हनिफ सागर या दोघांनी मिळून इलाहीना समजावून सांगितले यानंतर पुन्हा एकदा नव्या दमान नव्या विचारात इलाही नावाचा झरा निर्मळपणे खळखळू लागला महाराष्ट्राच्या मातीतलाहिरा पुन्हा एकदा तेजाळून निघाला. गजलेच्या दुनियेत पुर्वपक्षाही जास्त चमकू लागलाचा राजा प्रतिभेचा महामेरू, इलाही लिहिता झाला.

घर फिरलेल्या वाश्यावरती नको भरोसा ठेवू
दूध पाजल्या सापावरती नको भरोसा ठेवू (मोगरा -४५)

अशा प्रकारे न थांबत आपले काव्य मांडत गझलेचा प्रवास करताना या गझल प्रांतात इलाही जमादाराना असंख्य मित्र, मार्गदर्शक, अगणित रसिक भेटत गेले यामध्ये डॉ सुरेशचंद्र नाडकर्णी तशेचचित्रपट निर्माति उदय दादा लाड यानी तर १५ ऑगस्ट १९९४ साली इलाही जमादारांचे जखमा अशा सुगंधी पहिले पुस्तक स्वखर्चाने प्रकाशित केले प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले होते. इलाहीने २००७-८ पर्यंत गजल लिहिताना एक महत्त्वपूर्ण घटना घडली आकाशवाणी नागपूर ने एक गझल स्पर्धा घेतली. देशातल्या सर्व राज्यातून स्पर्धेकानी भाग घेतला होता त्यामध्ये ३६ प्रस्थापित भाषा आहेत. त्यामध्ये महाराष्ट्राचा गझलकार इलाही जमादार यांच्या गझलेची निवड झाली. २५ जानेवारीला दिल्ली आकाशवाणीवरून त्यांची गझल प्रसारित करण्यात आली ती गझल अशी

‘‘ध्वस्त झालेल्या घराना लागले सजवायला
राख झालेले निखारे लागले विझवायला” (जखमा अशा सुगंधी, पृ. १७)

या गझलेची देशपातळीवर झालेली वाहवा आणि तीन भाषेत झालेला अनुवाद इलाही जमादारांना आयुष्यातील एक अपूर्व आनंद वाटतो तशा प्रकारच्या भावना त्यांनी व्यक्तही केले आहेत. इलाहीने उर्दू गजलेचा सखोल अभ्यास करून त्याची प्रकृती अभ्यासात असतानाच मराठी गझलेचे वेगळेपण जपत नवोदित कवीच्या मनातील गजलेची भीती घालवण्याचे कार्य गझल कार्यशाळेच्या माध्यमातून अखंड सुरू ठेवले. त्यांचे पहिले साहित्य अपेक्षा फारच सुंदर आणि सुगंधी होते जखमा अशा सुगंधी गझल संग्रह त्यानंतर 'भावनांची वादळे', 'अर्घ्य, 'चांदनचुरा', 'वाटसरू', 'सखये', 'मला उमगलेली मीरा', 'गुप्तगु', 'आभिसारिका', अनुष्का, अनुराग, फुलपाखरू, निरागस', 'अमास', 'ओओसिस अशा विविध आणि समृद्ध

स्वरूपाचे गझल संग्रह हे मराठी साहित्यातील गजल विश्वाला समृद्ध करणारे आहे. मराठी गजलेत त्यांनी केलेले वेगवेगळे प्रयोग गझलेतील 'हजल' मराठी उर्दु, दीभाषी गजल जीवार काफीया गझल, मिश्रीत गझल, मुस्तजाद गझल से मिसरी, झुकाफिया गजल, मक्का बंद गझल, कवीचे नाव रदीफ असलेली गझल, अष्टाक्षरी गझल काफिया गझल सानी मिश्रा एकच असलेली गझल, छोटी बहर गझल, बड़ी बहर गझल, असे अनेक प्रकार मराठी गझल मध्ये आणले त्यातील सखे या गझल संग्रहाची वैशिष्ट्य असे की या संग्रहामध्ये सखये हा एकच रदीफ असलेल्या सर्व गजला आहे. 'तुझे मौन' संग्रह (म्हणजे ५०० शेर असलेली एकच गझल आहे. हे एक वेगळेपण असणारे वैशिष्ट्य आहे.

अभ्यास विषयाचे महत्व-

गझल इराणमध्ये नवव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये अरबी संस्कृती व इराणी संस्कृती इस्लाम धर्म व त्यातील सुफी पंत, अरबी भाषा खमीयात हा मध्यगीताचा अरबी प्रकार व कसीदा हा फार्सी स्तुतीकाव्याचे इराणमध्ये एकीकरण झाले. भारतात मुस्लिमांचे तसेच त्याच्या पाठोपाठ सुफी साधू सताचे आगमन झाले आणि त्याच्या बरोबरीने गझल या फार्सी भाषेतील काव्यप्रकारानेही बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात आगमन केले. ऐतिहासिक पत्रव्यवहार व बखर हे वाङ् मय मुस्लिमांच्या संपर्कामुळे मराठीत आले. रा. श्री. जोग असे म्हणतात,"पालगायकी आणि टप्पा ठुमरी, कव्वाली, गझल यासारखे गायनाचे प्रकार शायरी तंत्र बाबीही मराठ्यांनीही

मराठीत सर्वप्रथम अमृतराय सोळाशे (इ.स. १६९८ से १७५३) तसेच संगीत नाटिका, किर्लोस्करांचे संगीत शाकुंतल यात गझल गायनाच्या अंगाने पदे आली. अशी गझलरचना १९२० पर्यंत होती. पुढे ती रविकरण मंडळानी (१९२० ते १९४०) पर्यंत फुलवले नंतर माधव जुलियन यांनी काळ गाजवला पुढे मात्र १९५३ साली वि.द. घाटे हयांनी तर ला रा. श्री. जोग यांनी मराठी गझल हा काव्यप्रकार मराठीतुन लुप्तप्राय झाला. अशा आशयाचे उद्धार काढलेले आढळतात १९६५ च्या सुमारास कवी सुरेश भटानी मराठीत खऱ्या अर्थाने गझल रुजवले. माधव ज्युलीयन यांनी ही गझल मराठीत आणली. सुरेश भटाने मराठी गझलेला साज चढवला, तर इलाही जमादार यानी मराठीत गजलेचा दर्जा वाढवला असे म्हणायला हरकत नाही. यामुळे इलाहीने मझल प्रातात आपल्या गझल लेखन प्रयोगाने एक वेगळे वैशिष्ट्यपूर्ण गजल साहित्याला योगदान दिले गझलेच्या प्रवाहाला यामुळे वेग आला इलाही जमादारांच्या अशा विविध गजल संग्रहातील देदीप्यमान अशा गझलाद्वारे गझलेत मक्ता लिहून गझलांची मक्तेदारी नव्याने निर्माण केले वाटसन मधून विविध सामाजिक सांस्कृतिक प्रतिमान जपल्या. भारतीय संस्कृतीचे त्याग, शांतता, संयमाचे मूल्य रुजवली गेली. मुक्त, रुपयाची ही लेखन तंत्र मराठी गजलेत अवतरण्याची किमया इलाहिणी केले स्वतःच्या जखमाना सांभाळताना नैराश्य येऊ न देता जखमांना सुगंधीपण देणारा अवलिया म्हणजे इलाही जमादार होय त्यांच्या गजला आशयगर्भ आणि वैचारिक चिंतनाचा भाग आहे.

१. "आकाशाला भास म्हणालो चुकलो का हो
धरतीला इतिहास म्हणालो चुकलो का हो"

२ "असे बागेवर उपकार केले....
"कत्तली करूनी फुलाचे हार केले"

अशा प्रकारच्या गझला लिहून गजलेचे दालन समृद्ध केले. आहे मराठी गझलेचा मानबिंदूच इलाहींना म्हणावे लागेल. यामुळे त्यांच्या जखमा आशा सुगंधी, "भावनाची वादळे, अर्घ्य, सखये', 'ओॲसिस', 'आभास. 'निरागस', 'अनुराग', 'अभिसारिका', 'अनुष्का', 'फुलपाखरू संग्रहातील गझल जिवनानुभवाचा साक्षात्कार आहे. यास्तव गझल साहित्याचा अभ्यास होणे महत्वाचे वाटते.

संशोधनाची उदिष्ट्ये-

१) इलाही जमादार यांच्या गझलेतून येणाऱ्या जीवनानुभावाचा अभ्यास करणे.

२) इलाही जमादाराच्या गझलातील प्रतीके प्रतिमांचा वापर कौशल्यांचे स्वरूप समजून घेणे.

3) गझलेतील वेगवेगळ्या प्रयोगात तंत्राचे स्वरूप समजून घेणे.

४) इलाही जमादारांच्या गझलेतील असे गर्भाचे स्वरूप समजून घेणे.

५) एकंदरीत इलाही जमादारांच्या गझल साहित्याचे, आकृतीबंधाचे स्वरूप समजून घेणे,(५) मराठी गझलेतील येणाऱ्या जीवनानुभ्यापेक्षा इलाहीच्या गझलेतील जीवनानुभव वेगळ्या प्रकारचे आहे.

२) इलाही जमादारांच्या गझला था आशय गर्भ संपन्न असून वैचारिक चितनाचा विषय आहे

३) इलाहीच्या गझला रसिकाना त्यातील शब्द, भाव, रचना एका वेगळ्या वळणाची गझल वाटत असल्याने वाचकांना, श्रोत्याना रसिकांना भुरळ पाडणारी आहे

४) गझलेत वेगवेगळे प्रयोग करण्याची कौशल्य गझलेत दिसून येते।

५) गझलेला एका वेगळ्या धाटणीवर नेऊन नवगझलकरांना गझलतंत्र मार्गदर्शक ठरते

संशोधनाची विषयाची व्याप्ती-

यामध्ये जखमा अशा सुगंधी भावनाची चादळे, अर्घ्य, ओॲसिस, आभास निरागस, अनुराग , अभिसारिका, अनुष्का, सखये, फुलपाखरू इ. या गझलेतील जीवनानुभव, प्रतिमा, प्रतिके, आशयगर्भता, विभिन्न गझल लेखन प्रयोग,आकृतीबंध, गझलेचे वैशिष्ट, गझल सत्रातील नावीन्यता या सर्व बाबीचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंध इलाही जमादार यांची गझल: एक चिकित्सक अभ्यास" म्हणून करता येईल.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी गझल साहीत्याचा अभ्यास प्रामुख्याने वर्णनात्मक पद्धतीने केला जाईल.

संशोधन विषयाची प्रकरण निहाय माडणी

१) गझल संकल्पना व स्वरूप -

या पहिल्या प्रकरणान गझलेली पूर्वपीठीका गझलेचा उगम गडलेले भारतातील आगमन मराठी गझल परंपरा तसेच मराठी गझलेचा विकास सांगता येईल.

२) इलाही जमादार व्यक्ती आणि वाङ:मय-

या दुसऱ्या प्रकरणात इलाही जमादार यांचा जीवनपट लौकिक जीवन, शिक्षण परिस्थिती, लेखन उत्तेजन, वैवाहिक जीवन, जीवनाची अखेर, तसेच वाडमयीन व्यक्तित्वामध्ये गझल क्षेत्रातील कामगिरी गझलेतील विविधता गझल निर्मिती प्रक्रिया, विविधता याचा शोध घेता येइल. इलाहीचे गझल विचार ज्यामध्ये स्वरूप व्याख्या, गजले बाबत नोंदी गझल संग्रह यांचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात करता येईल. तसेच या प्रकरणामध्ये इलाहींच्या गझल साहीत्यप्रकाराची साहीत्य प्रेरणा व स्वरुपाची मांडणी करता येइल.

३) इलाहींच्या गझलेतील जीवनानुभव-

या तिसऱ्या प्रकरणा मध्ये गाललेतील जीवनानुभव विषयानुसार जसे प्रेम वैचारीक, सामाजीक, सांस्कृतिक दु. ख. विरह एकाकीपणा राष्ट्रीय एकात्मता मूल्ये नित्सर्ग, नातेसंबंध, प्रबोधन, इलाहीची प्रतिमा सृष्टी, गलेतील प्रतिबिंबाचे सुधीपण आणि भाषाशैलीचा अभ्यास करता येईल.

४) इलाहीचे गझलेतील विविध प्रयोग-

इलाही जमादार यांनी मराठी गझल साहित्य प्रकारात वेगवेगळया तंत्राचा अभ्यास करून उर्दूतून मराठीत आनले आहे जसे की-
१) जल (टिका) २) उर्दू मराठी मराठी-उर्दू (व्दीभाषी गझल) ३) त्रिवार काफिया गझल ४) मुस्तीजादगझल ५) से मिसरी गझल ६) जूल काफीया गझल ७) मुक्ता बंद गझल ८) रदीफ असलेली गझल ९) अष्टाक्षर मल १०) सवती काफिया गझल ११) सानी मिसरा १२) छोटी बहर गझल १३) चौदावे रत्न १४) मतला बंद गझल:

असे जवळपास २५ गझल प्रकार इलाही जमादारांनी मराठीत आणले आहे यासर्व प्रकाराचा अभ्यास करता येईल

५) इलाही च्या गझलेचे विशेष

आशयगर्भ लेखन, वैचारीक चिंतन, जखमा सुगंधी करण्याचे कौशल्य, चितन. आत्मशोध बोध सृजनत्व, अशा विविध अंगाने विश्लेषण करता येईल

(६) निष्कर्ष-

या शेवटच्या प्रकरणात संशाधनाती उपलब्ध झालेले निष्कर्ष मांडता येइल

संदर्भ ग्रंथ सूची

१. गझल चितन (२०१७) डॉ अविनाश सांगोलेकर

२. मराठी गझल प्रवाह आणि प्रवृत्ती - (२०१७) डॉ. अविनाश सांगोलेकर

३. मराठी गझल (२०१४) अर्धशतकाचा प्रवास रामपडीत

४. कोहीनूर (२०१८) ए. गझल इलाही- डॉ. राम वाघमारे

५. जखमाचे सुगंधीपण जपणारा गझलकार इलाही (२०१८) डॉ राम वाघमारे

६. मराठी गझल आकृती आणि आशय (२०२२) वैक्कु

इलाही जमादार यांचे गझल संग्रह-

७. जखमा अशा सुगंधी (१९९४)

८. भावनांची वादळे (२००१)

९. अर्घ्य (२००४)

१०. ओॲसिस (२००९)

११. आभास (२०१०)

६. निरागस - (२०१०)

१२. अनुराग (२०१४)

१३. अभिसारिका (२०१४)

१४. अनुष्का - (२०१४)

१५. फुलपाखरू - (२०)

१६. तुझे मौन (२०१७)

१७. मी पाहीलेली मीरा

१८. सखये - (२००५)

१९.२००५ मराठी गझल रुमेलनाध्यक्ष भाषण-

२०. गझलधारा (संपादन) -

२१.छंदोरचना - (१९९५) जोशी ना. ग.

२२.गज्जलांजली - (१९३३) माधव जुलियन

२३. गजल बाराखडी - (१९८७) सुरेश भट

२४. मराठी गजल आज आणि उद्या (१९८६) संगोराय श्रीरंग -

२५. छन्दशात्र व संगीत - (१९८०) जोशी बाबुराव

२६. मराठी गजल १९२० ते १९८५ - (१९९५) निहारा प्रकाशन

२७. गझलेचे फारसी-उर्दू बहर२८) काव्यचिकित्सा (१९६४) ग. त्र्यं. खानोलकर

२९. गझल सुरेश भटानंतर (२०११) संपादक डॉ. राम कदम

३०. मराठी गझलविष(२००५) मध

३१. मराठी गझलेचा उगम: स्वरूप आणि मीमासा १९९३) - डॉ. अविनाश कांबळे (सागोलेकर)

संशोधक

प्रा.विनोद यादवराव कांबळे
(एम.ए.बी.एड्,नेट)

मार्गदर्शक

डॉ. राजेंद्रकुमार लक्ष्मण लोणे
मराठी विभाग प्रमुख
श्री रेणुकादेवी वरिष्ठ महाविद्यालय, माहूर